## महाराष्ट्र राज्य महिला आयोग व वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा विद्यापीठात
## महाविद्यालयीन मुलींसाठी कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा दि.११/१०/२०१८ रोजी विद्यापीठातील डॉ. के. जी. देशमुख सभागृह येथे ***महाविद्यालयीन मुलींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन*** या विषयावर एकदिवसीय *कार्यशाळा* आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, उदघाटक म्हणून महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे जिल्हा समन्वयक जयवंत गाडेकर, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. राजेश जयपुरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख आदि मान्यवर उपस्थित राहतील. सदर कार्यशाळा नि:शुल्क असून अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांममधील विद्यार्थिनी उपस्थित राहू शकतात. सहभागींना महाराष्ट्र राज्य महिला आयोग व वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा संयुक्त विद्यमाने उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदर कार्यशाळेची नोंदणी कार्यक्रमापूर्वी करण्यात येत असल्याने कार्यशाळेला येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी दि. ०९/१०/२०१८ पर्यंत आपली नाव नोंदणी वुमेन्स स्टडीज सेंटरकडे नोंदवावे. विद्यार्थीनी नावांची नोंदणी ही प्रत्यक्ष सेंटरला भेट देऊन करू शकतात. किंवा wscsgbau@rediffmail.com या इ-मेल आयडी वर मेल पाठवून करू शकतात अथवा खाली दिलेल्या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधूनही करू शकतात.

अधिक माहितीसाठी वुमेन्स स्टडीज सेंटर मधील डॉ. मनीषा इंगळकर - मो. नं. ९९२२४७५९५० व आरती घुईखेडकर - मो.नं. : ७७९६७८२३०८ यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

तरी महाविद्यालयीन विद्यार्थीनींनी कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वुमेन्स स्टडीज सेंटरच्या समन्वयक डॉ. वैशाली गुडधे यांनी केले आहे.

**समन्वयक**
वुमेन्स स्टडीज सेंटर